# प्रधानमंत्री पीक विमा योजना

**प्रा. श्रीराम सुराणा**
सहाय्यक प्राध्यापक
विस्तार शिक्षण विभाग
डॉ. गंगाधरराव पाथ्रीकर कृषी महाविद्यालय, पाथ्री, फुलंब्री

**कु. स्मिता गंभीरे**
कृषी पदव्युत्तर पदवी विद्यार्थीनी
विस्तार शिक्षण विभाग
कृषी महाविद्यालय, लातूर

नैसर्गिक आपत्ती कीटकांचा प्रादुर्भाव किंवा अचानक उद्भवणाऱ्या घटना यामुळे होणारे पिकांचे नुकसान येणारे अपयश यासाठी शेतकऱ्यांना विम्याची संरक्षण देणे आणि आर्थिक पाठबळ देणे हा प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा महत्वाचा उद्देश आहे.

### या योजनेचा कोणाला फायदा होऊ शकतो ?

अधिसूचित विभागांमध्ये अधिसूचित पिके घेणारे भागीदार शेतकरी आणि भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांच्यासह सर्व शेतकरी संरक्षणास पात्र आहेत परंतु शेतकऱ्यांना अधिसूचित विविध पिकांमध्ये विमायोग्य स्वारस्य असले पाहिजे. कर्जदार शेतकऱ्यांसह सर्व शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांना अधिसूचित पिकांसाठी कोणत्याही वित्तीय संस्थांकडून सहकारी बँका प्रादेशिक ग्रामीण बँका वाणिज्यिक बँका खाजगी बँका आपले वगैरे कृषी कार्यासाठी हंगामी कर्ज घेतले आहे आणि जे अंतिम मुदतीच्या तारखेच्या सात दिवस अगोदर योजनेतून बाहेर पडलेले नाहीत अशी शेतकरी त्यांच्या वित्तीय संस्था द्वारे योजनेत नाव नोंदणी करण्यास पात्र असतील.

### उद्दिष्टे:

- नैसर्गिक आपत्ती, कीटक आणि रोगराई यामुळे पिकांना नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण व आर्थिक आधार देणे.
- नवीन व आधुनिक शेतीपद्धतीचा स्वीकार करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे.
- शेतीमध्ये टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करणे.
- कृषी क्षेत्राला पतपुरवठा करत राहणे, ज्यामुळे अन्नसुरक्षा लाभेल, पीक पद्धतीत बदल होईल, कृषी क्षेत्रात स्पर्धात्मकता येऊन कृषी तंत्राची वाढ होईल

### विमा मिळण्यास पात्रता परिस्थिती:

- शेतात पाणी साठणे, पूर येणे अशा आपत्तींना स्थानिक संकट मानण्यात येईल. प्रभावित शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करून भरपाई किंवा दावा रक्कम दिली जाईल.
- पीक काढण्याच्या दिवसापर्यंत जर पीक शेतातच असेल आणि त्या दरम्यान आपत्ती, वादळ, अवकाळी पाऊस आल्यास शेतकऱ्यांना दावा रक्कम मिळेल.

### जोखमीच्या बाबी:

पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असलेले पिकाचे खालील टप्पे या योजनेत समाविष्ट आहेत.

### प्रतिकूल हवामान घटकांमुळे पेरणी / लावणी / उगवन जोखीम:

कमी पाऊस किंवा प्रतिकूल मौसम / हवामान परिस्थिती यामुळे येथे विविध क्षेत्रात पेरणी लागवड उगवण न होणे.

### सर्व समावेश जोखीम विमा संरक्षण:

उभ्या पिकाला असलेली (पेरणी ते कापणीपर्यंत) अप्रतिबंधित जोखमीमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीसाठी सर्व समावेश जोखीम विमा संरक्षण दिले जाते. राज्य सरकार द्वारे पिकाच्या प्रायोगिक कापणी द्वारे प्रत्यक्ष पिकाच्या अंदाज घेतला जातो.

### हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान:

सर्वसाधारण काढणीच्या १५ दिवस आधीपर्यंत पूर, पावसातील खंड, दुष्काळ इत्यादी बाबींमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पन्नामध्ये सरासरी उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर विमा संरक्षण देय राहील.

### कापणी पश्चात नुकसान:

कापणीनंतर सुकविण्यासाठी स्थितीत / लहान गाड्यांमध्ये बांधलेल्या स्वरूपात पसरलेल्या पिकासाठी जास्तीत जास्त १४ दिवसांसाठी गारपीट, चक्रीवादळ, वादळी पाऊस, आणि अवकाळी पाऊस याविरुद्ध संरक्षण उपलब्ध आहे. बाधित शेतकऱ्यांना आपत्तीनंतर ७२ तासांच्या आत विमा कंपन्याच्या टोल फ्री क्रमांकावर थेट किंवा संबंधित पेन स्थानिक सरकारी कृषी विभाग सरकारी जिल्हा अधिकाऱ्यांमार्फत दाव्यांनी माहिती द्यावी.

### स्थानिक आपत्ती:

अधिसूचित क्षेत्रातील एकट्या शेतकऱ्याने गारपीट, दरड कोसळणे, जलप्रलय, ढगफुटी आणि वीज कोसळणे लागलेली नैसर्गिक आग यामुळे अधिसूचित विमीत पिकाचे नुकसान, हानी पोहोचल्यास बाधित शेतकऱ्यांनी आपत्तीनंतर ७२ तासांच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर किंवा संबंधित बँक स्थानिक सरकारी कृषी विभाग सरकारी / जिल्हा अधिकाऱ्यांमार्फत दाव्यांनी माहिती द्यावी.

### योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून आवश्यक व बंधनकारक दस्तऐवज व कागदपत्रे:

- आधार कार्डची प्रत
- योग्य प्रकारे भरलेला प्रस्ताव पत्र

- सात बारा / जमिनीचा ताबा सिद्ध करणारे प्रमाणपत्र
- लागू कंत्राटी त्याचे प्रतिज्ञापत्र / भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी करार
- आई एफ एस सी क्रमांक आणि बँकेचा खाते क्रमांक असलेली बँकेची पासबुकची प्रत किंवा रद्द केलेला धनादेश
- राज्य सरकार विहित पेरणी प्रमाणपत्र किंवा प्रास्तविक पिकाची पेरणी करण्याचा उद्दिष्टाचे स्वत:चे घोषणापत्र

**संरक्षण आणि दाव्यासाठी पूर्वअटी:**

**विस्तुत प्रमाणातील आपत्ती (हंगामाच्या अखेरच्या उत्पन्नावर आधारित):**

क्षेत्रासंबंधी दृष्टिकोनानुसार दावे निकाली काढण्यात येतील. राज्य सरकारद्वारे अधिसूचित विमाक्षेत्र पातळीवरील प्रायोगिक पीक कापणी द्वारे प्रत्यक्ष उत्पन्नाचा अंदाज केला जातो आणि उंबरठा उत्पन्न आणि चालू हंगामातील प्रत्यक्ष उत्पन्न यातील फरका द्वारे तुट निश्चित केली जाते.

**हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान:**

प्रतिकूल हंगामी परिस्थितीमुळे सामान्य उत्पन्नाच्या तुलनेत हंगामात प्रभावीत पिकाचे अपेक्षित उत्पन्न ५० टक्के पेक्षा कमी असेल तर अशा पिकांना ते लागू आहे. अधिसूचित विमाक्षेत्र मध्ये विविध प्रॉक्सी निर्देशकाद्वारे उदा. पावसाची माहिती इतर हवामानासंबंधी माहिती सॅटेलाईट द्वारे प्राप्त छायाचित्र वगैरे नुसार राज्य शासनाद्वारे ठराविक पिकासाठी किंवा पिकाच्या गटासाठी ही तरतूद लागू केली जाऊ शकते. सामान्य कापणीच्या वेळेच्या १५ दिवस अगोदर प्रतिकुल घटना घडल्यास लागू केली जाणार नाही ही तरतूद लागू केल्यानंतर संभाव्य दाव्याच्या २५ टक्के रक्कम देय असेल जे अंतिम दाव्याच्या समायोजनाचा अधीन असेल.

**प्रतिकूल हवामान घटकांमुळे पेरणी / लावणी / उगवण न होणे:**

पेरणी केलेल्या ७५ टक्के पेक्षा जास्त शेत्रातील पीक प्रभावित होण्याची व्यापक घटना घडल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात येईल. पावसाची माहिती, इतर हवामानासंबंधी माहिती, सॅटेलाईट द्वारे प्राप्त छायाचित्र वगैरे सारख्या प्रॉक्सी निर्देशकाद्वारे आधारित राज्य सरकार द्वारे ही तरतूद लागू करण्यात येते. राज्य शासनाच्या नोंदणीच्या शेवटच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत ही तरतूद अधिसूचित करण्याची गरज असते एकदा तरतूद लागू करण्यात आली की, सबसिडी मिळण्याच्या अधीन राहून ३० दिवसाच्या आत दाव्याचे निराकरण देण्यात येईल.

**कापणीनंतरचे नुकसान आणि स्थानिक आपत्ती:**

उत्पादन हानीचे मुल्यांकन वैयक्तिक भूखंडाच्या आधारे करण्यात येते. विमाधारक शेतकऱ्यांनी आपत्तीनंतर ७२ तासाच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांक १८०० २६६ ०७०० किंवा क्रॉप इन्शुरन्स ॲप वर माहिती कळविणे आवश्यक आहे. ह्या माहितीचा सर्वे नंबर नुसार विविध पिकांचा तपशील आणि हेक्टरी नुकसान याचा समावेश असावा व पुराव्याचे कागदपत्र म्हणून योग्य प्रकारे भरलेली दावा प्रपत्र सात दिवसाच्या आत सादर करावे.

(संपर्क: +९१ ९६७७७८२१३१)

★ ★ ★

## द्राक्षापासून बेदाणे प्रक्रिया उद्योग

द्राक्षांपासून बेदाणे तयार करणे हा तसा हंगामी व्यवसाय आहे. ज्या सिझनमध्ये द्राक्षांचे उत्पादन होते त्याच सिझनमध्ये हा व्यवसाय करता येतो. द्राक्षांची फळे ही नाशवंत असलेने लवकर खराब होतात. त्यामुळे त्यांच्यावर प्रक्रिया करून बेदाणे बनवले तर जास्त दिवस टिकतात. ग्रामीण भाषेत बेदाण्यांना मनुके असेही म्हणतात. द्राक्षांवर विशिष्ट प्रक्रिया करून त्याचे बेदाणे बनवले जातात. तसा हा शेतीपूरक व्यवसाय आहे. बरेचसे द्राक्ष उत्पादक शेतकरी बेदाणे तयार करण्याचा जोड व्यवसायही करतात. बेदाणे व मनुके यांची विक्री ड्रायफ्रुट विकणारे विक्रेते करतात. बेदाणे बऱ्याच प्रकारच्या मिठाई बनवताना वापरतात. बेकरी पदार्थ, स्वीट मार्ट, जेवण बगैरे बनवताना हमखास वापरतात. बेदाणे मध्ये विटॅमीन व प्रोटिन्स जास्त असलेने शक्तिवर्धक खाद्य म्हणूनही लोक मनुके खातात.

चांगल्या प्रतीचा बेदाणा तयार करावयाचा असेल, तर बेदाणे तयार करतेवेळी एकसारख्या आकाराचे, रंगाचे घड बागेतून तोडावेत. घड काढण्यापूर्वी मण्यामध्ये साखरेची गोडी उतरली आहे याची खात्री करून घ्यावी, कारण चांगल्या प्रतीचा बेदाणा म्हटल्यास त्यात गोडी जास्त असावी लागते. काढलेली द्राक्षे शक्यतो सुरवातीला स्वच्छ पाण्यातून काढून घ्यावी. त्यानंतर ही द्राक्षे २५ ग्रॅम पोटॅशिअम कार्बोनेट अधिक १५ मि.लि. ईथाइल ओलिएट (डीपिंग ऑइल) प्रति लिटरच्या द्रावणात दोन ते चार मिनिटे बुडवून ठेवावीत. या द्रावणाचा सामू ११ पर्यंत असावा. त्यानंतर द्रावणातून काढलेली द्राक्षे सावलीमध्ये जाळीवर सुकवावीत.

वातावरणातील तापमानानुसार १५ ते २२ दिवसांत चांगल्या प्रतीचा बेदाणा तयार होऊ शकतो. चांगल्या प्रतीचा बेदाणा तयार करायचा असेल, तर जास्त तापमान ३५-४० अंश से. व आर्द्रता ३० टक्केपेक्षा कमी असल्यास त्याचे परिणाम चांगले मिळतात. वाऱ्याचा वेग कसा आहे, यावरसुद्धा बेदाण्याची प्रत अवलंबून असते. हवा खेळती असल्यास कमी वेळेत चांगल्या प्रतीचा बेदाणा तयार होतो.